छत्रपती संभाजीनगर । बीड । परभणी । लातूर । धाराशिव । नांदेड येथून एकाच वेळी प्रकाशित होणार दैनिक

दैनिक
बीड, छत्रपती संभाजीनगर,लातूर, धाराशिव, परभणी, जालना,नांदेड
मराठवाड्याचे प्रत्येक घडामोडीचे दर्पण

# मराठवाडा दर्शन

Mo.9028349999
E-Mail : marathwadadarshannews@gmail.com
MARATHWADA DARSHAN
संपादक : दत्तात्रय बालासाहेब हंडीबाग

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -२८९ | गुरुवार दि.०३ जुलै २०२५ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७७८५ | किंमत ३ रू | । पाने ४


Beed (Maharashtra) | DAILY | MARATHI | Year-02 | Issue -289 | THURSDAY DT.03 JULY 2025 | RNI : MAHMAR/2023/87785 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

प्रतिनिधी पाहिजेत
" दैनिक मराठवाडा दर्शनसाठी "
मराठवाड्यातील सर्व जिल्हे
तालुका, गावस्तरावर
प्रतिनिधी नेमणे आहेत.
:: संपर्क ::
MO.9028349999

# डमी पेमेंट ॲप्स वापरून स्मार्ट फसवणूक

पुणे/नागपूर : सोशल मीडियात लोकप्रिय पेमेंट ॲप्सच्या बनावट डमी ॲप्सचा अलिकडे मोठ्या प्रमाणावर वापर वाढला आहे. या माध्यमातून ओरिजिनल ॲप्ससारखा इंटरफेस, पेमेंट स्क्रीन आणि अगदी ट्रान्जॅक्शन साऊंडसुद्धा असतो. सायबर गुन्हेगाराकडून अशा ॲप्सचा वापर केला जात आहे. यातून अनेकांना गंडा घातला जातो.

ओरिजनलसारखा इंडस्फेस, टोन, हिस्टरी दाखवत सायबर गुन्हेगारांकडून गंडविण्याचे प्रकार अलिकडे वाढले आहेत. डमी पेमेंट ॲपच्या माध्यमातून अनेकांची फसवणूक होत आहे. बनावट ॲप्सचा वापर करून पेमेंट करण्याचा धोका हा दुकानदार, छोटे आणि मध्यम स्वरूपाच्या व्यापा-यांना अधिक आहे. सायबर गुन्हेगार हा डमी ॲप्सचा वापर करत त्यांची फसवणूक करू शकतो.




पेमेंट खरे की खोटे, नेमके कसे ओळखाल

बनावट, डमी पेमेंट ॲपपासून सावध राहण्याची गरज आहे. ते पेमेंट खरे की खोटे, हे ओळखण्यासाठी आपण दक्षता बाळगावी. संशय वाटला तर प्रतिसाद नको. आपण ज्यावेळी ऑनलाइन पेमेंट स्वीकारत आहात, त्यावेळी विशेष काळजी घेण्याची गरज आहे. अशावेळी डमी पेमेंट ॲप्सचा वापर होण्याचा धोका अधिक असतो.

कोठे करावी रितसर तक्रार

ऑनलाइन पेमेंट करताना एखाद्याने आपली फसवणूक केली तर तातडीने जवळच्या पोलिस ठाण्यात, सायबर सेलकडे तक्रार करता येईल.

अनेकांना गंडा


जानेवारी ते जूनअखेर सायबर गुन्हेगारांकडून अनेकांना गंडविल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. ऑनलाईन गंडा घातल्याने लाखो रुपयांनी फसवणूक झाली आहे.

पेमेंटचा मेसेज आल्याशिवाय व्यवहार पूर्ण होत नाही

एखाद्याने ऑनलाइन पेमेंट केले तर मोबाइलवर पेमेंटचा मेसेज आल्याशिवाय, आपल्या खात्यावरील रक्कम चेक करावा.

# मोहम्मद शमीला हायकोर्टाचा झटका

## पत्नी-मुलीला दर महिन्याला द्यावे लागणार लाखो रुपये



भारतीय क्रिकेट संघाचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला घटस्फोट प्रकरणात कोलकाता उच्च न्यायालयाने मोठा झटका दिला आहे. उच्च न्यायालयाने शमीला त्याची पत्नी हसीन जहाँ आणि मुलगी आयरा यांना दरमहा ४ लाख रुपये देण्याचे निर्देश दिले आहेत.शमी आणि हसीन जहाँ हे बऱ्याच काळापासून वेगळे राहतात. न्यायालयाचा निर्णय सात वर्षांपूर्वीपासून लागू असणार आहे. शमीला ही रक्कम देखभाल खर्च अथवा पोटगी म्हणून द्यावी लागेल. यानुसार त्याला दरमहा पत्नीला १.५ लाख रुपये तर मुलीला २.५ लाख रुपये द्यावे लागतील.

न्यायाधीश अजय कुमार मुखर्जी यांच्या खंडपीठाने हसीन जहाँच्या याचिकेवर मंगळवारी हा आदेश दिला आणि भारतीय क्रिकेटपटूला दरमहा देखभाल देण्याचे निर्देश दिले आहेत. माझ्या मते, याचिकाकर्ता क्रमांक १ (पत्नी) ला दरमहा १.५ लाख रुपये आणि त्यांच्या मुलीला दरमहा २.५ लाख रुपये देणे दोघांच्याही आर्थिक स्थिरतेसाठी योग्य ठरेल. शमी त्याच्या मुलीच्या शिक्षणासाठी अथवा इतर काही खर्चासाठी निर्धारित रकमेव्यतिरिक्त अधिक काही स्वेच्छेने देऊ इच्छित असेल तर, त्यासाठी तो स्वतंत्र आहे, असे न्यायाधीशांनी आपल्या आदेशात म्हटले आहे.महत्त्वाचे म्हणजे, शमीला त्याची पत्नी हसीन जहाँला, दरमहा १.५ लाख रुपयांप्रमाणे सात वर्षांचे १ कोटी २६ लाख रुपयेही द्यावे लागतील. तर, मुलगी आयरालाही २.५ लाख रुपये महिन्याच्या हिशेबाने, २ कोटी १० लाख रुपये द्यावे लागतील. अशा प्रकारे मोहम्मद शमीला सात वर्षांचे ३ कोटी ३६ लाख रुपये द्यावे लागतील.



# बलभीमच्या दोन विद्यार्थ्यांची एसबीआय बँकेत निवड

बीड ।प्रतिनिधी

येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे विद्यार्थी नंदलाल विनायक करांडे व संकेत सोमेश्वर शेटे या विद्यार्थ्यांची भारतीय स्टेट बँकेत (डइख उश्रशीज्ञ) या पदावर निवड झाली आहे. नंदलाल विनायक करांडे हा महाविद्यालयाचा २०२२ या वर्षीचा तर संकेत सोमेश्वर शेटे हा २०१८ या वर्षीचा पदवी प्राप्त विद्यार्थी आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष उंदरे यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब कोकाटे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. संजय रत्नपारखे, डॉ. वृशाली कुटे, डॉ. भारत दहे, डॉ. संदीपकुमार उणवणे, प्रा. जाधव यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# खुनाच्या प्रकरणात ॲड. अविनाश गंडले यांच्या प्रभावी युक्तीवादामुळे दोन आरोपींची निर्दोष मुक्तता

## एक वर्ष सहा महिने अठ्ठावीस दिवसांमध्ये आरोपींची निर्दोष मुक्तता

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, दि. ०१/०८/२०२५ रोजी फिर्यादी नितीन नारायण माने याने पोलिसांनी दिलेल्या माहिती आधारे ग्रामीण पोलीस स्टेशन बीड येथे तक्रार दिली की, चऱ्हाटा रोडवरील रेल्वे ब्रिजच्या खाली मृत अवस्थेत एक प्रेत पडलेला आहे. सदरील माहिती फिर्यादीस मिळाल्यानंतर तो महाबळेश्वर येथे असल्याने त्यांनी त्याच्या घरच्या नातेवाईकांना घटनास्थळी पाठवून शहानिशा केली असता सदरील मृतप्रेत हे फिर्यादीचा भाऊ नामे पांडुरंग उर्फ पप्प्या नारायण माने यांच्या आहे हे निष्पन्न झाले. घटनेच्या दिवशी फिर्यादी सोबत विकास वायकुळे व ओंकार लकडे हे दोघे असल्याने केवळ संशयावरून त्यांच्याविरोधात तक्रार दिली.

पोलिसांनी प्रकरणाचा तपास करून सदरील प्रकरणांमध्ये मा. जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे दोषारोपपत्र दाखल केले. त्यानंतर मा. न्यायालयात सेशन केस क्रमांक २१९/२०२३ हे प्रकरण करण्यात आले आरोपींच्या वतीने ड. अविनाश पं. गंडले यांनी तपासी अधिकाऱ्यासह एकूण १२ साक्षीदार तपासले. आरोपी पक्षाचा बचाव करतांना सातत्यपूर्ण पाठपुरावा, अभ्यासू युक्तिवाद तसेच आरोपींचा प्रस्तुत प्रकरणांमध्ये कसल्याही प्रकारचा सहभाग नसल्याचे




ड. अविनाश पं. गंडले मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब बीड यांनी प्रस्तुत प्रकरणातील दोन्ही आरोपींची कोणताही सबळ पुरावा नसल्याने तसेच आरोपींवर आरोप सिद्ध न झाल्याने निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणाकडे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्राचे लक्ष लागले होते. केवळ एक वर्ष सहा महिने अठ्ठावीस दिवसांमध्ये आरोपींची निर्दोष मुक्तता केल्याने ड. अविनाश पं. गंडले यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. आरोपींच्या वतीने ड. अविनाश पं. गंडले यांनी काम पाहिले तर त्यांना या कमी ड. इम्रान पटेल, ड. गोवर्धन पायाळ, ड. तेजस नेहरकर, ड. नामदेव माने, ड. किरण मस्के, ड. सुरक्षा जावळे, ड. शुभम सरवदे, ड. सचिन गिरी, ड. राजेश शिंदे, ड. अनिकेत गंडले, आशुतोष गंडले, आदींनी सहकार्य केले.

# फडणवीसांची माहिती:राज्यात तणावामुळे ४२७ पोलिस कर्मचाऱ्यांचा मृत्यू, कर्मचाऱ्यांशी संवाद साधावा

मुंबई /वृत्तसंस्था

राज्यात गेल्या अडीच वर्षांत ४२७ पोलिसांचा मृत्यू झाला असून यात २५ आत्महत्यांचा समावेश आहे. पोलिसांमध्ये वाढत असलेल्या मानसिक तणावामुळे ही स्थिती उद्भवली असल्याचे स्पष्ट होताच राज्य सरकारने तातडीने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. राज्यातील प्रत्येक पोलिस युनिटमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांना आता दर मंगळवारी आणि शुक्रवारी दोन तास कर्मचाऱ्यांशी संवाद साधावा लागणार आहे. आठवड्यात किती पोलिसांशी संवाद झाला याची नोंद ठेवण्याचे निर्देशही सरकारने दिले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत बुधवारी दिली.

सुनील शिंदे यांनी पोलिसांच्या ड्यूटीदरम्यान होणाऱ्या मृत्यूचा मुद्दा उपस्थित केला होता. या वेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पोलिसांच्या निवासस्थानाचा प्रश्न, आरोग्य व्यवस्था व डीजी लोन आदी प्रश्नांवरून सरकारला धारेवर धरले. पोलिसांच्या ड्यूटीचा ८ तासांचा कालावधी असला तरीही किमान १२ तास त्यांना काम करावे लागते. मुंबई पोलिस दलात कार्यरत असलेल्यांपैकी निम्म्याहून अधिक पोलिस मुंबईबाहेर वास्तव्यास आहेत. वसई, विरार, नवी मुंबई, पनवेलपासून कर्जत, कसारापर्यंत पोलिसांचे वास्तव्य आहे. यामुळे दिवसातील किमान १६ ते १८ तास त्यांचे ड्यूटी व प्रवासात जातात. त्यामुळे योगा आणि व्यायाम करण्यासाठी त्यांना वेळ मिळत नाही. पोलिसांचे सर्वाधिक मृत्यू हे हृदयविकाराच्या झटक्याने होत आहेत.




## अनुकंपा भरती मिशन मोडवर

राज्य शासनाच्या १५० दिवस आराखडा कार्यक्रमात पोलिसांच्या अनुकंपा भरतीसंदर्भातील सर्व प्रकरणे मिशन मोडवर निकाली काढली जातील. यासाठी सर्व विभागांना यासंबंधी आदेश देण्यात आले आहेत असेही फडणवीस यांनी सांगितले.

## ४० आजारांवर मोफत उपचार

गृह राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, मुंबई व महाराष्ट्र पोलिस दलात गेल्या काही वर्षांत हृदयविकार, कर्करोग, आत्महत्या अशा विविध कारणांमुळे पोलिस कर्मचाऱ्यांचे मृत्यू झाले. यात कार्डियाक अरेस्टमुळे ७५ मृत्यू, कर्करोगामुळे ६ मृत्यू झाले आहेत. पोलिसांच्या कल्याणासाठी शासन अनेक उपाययोजना राबवत असून यात ४० प्रकारच्या आजारांवर मोफत उपचार केले जात आहेत. यासाठी राज्यात २७० हॉस्पिटल्ससोबत टायअप केले आहे.

## पोलिसांसाठी गृहनिर्माण प्रकल्प

मुंबईसह राज्यभरात पोलिसांसाठी मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण प्रकल्प राबवले जात आहेत. तालुकास्तरावरही काम वेगाने सुरू आहे. पोलिस गृहनिर्माण महामंडळाचे काम अभूतपूर्व असल्याचे त्यांनी नमूद केले.

डीजी लोन योजनेचा उल्लेख करताना फडणवीस म्हणाले की, गृहमंत्रिपद आल्यानंतर ती पुन्हा सुरू करण्यात आली असून आता बॅकलॉग निकाली काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

# दिव्यांग, ज्येष्ठांना खा.बजरंग सोनवणेंमुळे मिळणार 'आधार'

## जिल्ह्यात १८ जुलैपासून कृत्रिम साहित्याचे वाटप, पंचायत समिती स्तरावर शिबीरांचे आयोजन

बीड (प्रतिनिधी)

दिव्यांग बांधवांना सहानुभूती नव्हे, तर भक्कम साथ देऊया!, या उदात्त दृष्टीकोनातून खा.बजरंग सोनवणे यांच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासन व एलिम्को मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने संपुर्ण बीड लोकसभा मतदार संघामध्ये दिव्यांग व्यक्तींना व ज्येष्ठ नागरिकांना मोफत कृत्रिम साहित्य/साधने वाटप करण्यात येणार आहे. दि.१८ जुलैपासून हे शिबीर पंचायत समिती स्तरावर राबविण्यात येत आहे.

बीड लोकसभा मतदारसंघातील तालुक्यांमध्ये भव्य पूर्व तपासणी व नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. या शिबिरांचा मुख्य उद्देश दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव, विविध सहाय्यभूत साधने उपलब्ध करून देणे, तसेच ज्येष्ठ नागरिकांना 'राष्ट्रीय वयोश्री योजने' अंतर्गत मोफत सहाय्यक उपकरणे प्रदान करणे हा आहे. एलिम्को, मुंबई या केंद्र शासनाच्या अधिकृत संस्थेच्या माध्यमातून, १८ जुलै ते ३० जुलै २०२५ या कालावधीत बीड लोकसभा मतदार संघात ही विशेष शिबिरे आयोजित केली जातील. या शिबिरांमध्ये पात्र लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी, नोंदणी प्रक्रिया आणि आवश्यकतेनुसार तात्काळ मोफत कृत्रिम अवयवांचे वाटप केले जाईल. हा उपक्रम दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी एक मोठा दिलासा ठरणार आहे. या माध्यमातून त्यांना आत्मनिर्भर होण्यास आणि दैनंदिन जीवन सुलभ करण्यास मदत मिळेल.

बीड लोकसभा मतदारसंघातील जास्तीत जास्त दिव्यांग बांधवांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिरांमध्ये सहभागी होऊन या योजनेचा लाभ घ्यावा. जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांपर्यंत गावचे प्रमूख म्हणून सरपंच आणि गावातील तरूणांनी ही माहिती द्यावी, जेणे करून त्यांना या शिबीराचा लाभ होईल.

-खा.बजरंग सोनवणे, बीड लोकसभा मतदारसंघ

बीडीओ असतील नोडल अधिकारी

पुर्व तपासणी शिबीरासाठी संबंधीत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना दिव्यांग नोडल अधिकारी म्हणुन काम करावयाचे आहे. सदर पूर्व तपासणी शिबीरासाठी बीड जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील कर्मचारी यांना दिव्यांग दूत म्हणुन नियुक्त करण्यात आले आहे. मुख्याध्यापक यांच्या नियंत्रणाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे दिव्यांग दूत म्हणून काम करतील.

तालुकानिहाय दिव्यांग दूत शाळा-

केज: मतिमंद निवासी विद्यालय, उमरी मुकबधीर निवासी विद्यालय, उमरी अस्थिव्यंग निवासी विद्यालय, केज.

अंबाजोगाई: ज्ञानवर्धिनी मूकबधीर निवासी विद्यालय, अंबाजोगाई योधवधिनी मतिमंद निवासी विद्यालय, अंबाजोगाई अहिल्यादेवी मुकबधीर निवासी विद्यालय, अंबाजोगाई ज्ञानसागर कर्णबधीर निवासी विद्यालय, जवळगाव सेवा मतिमंद कार्यशाळा, धानोरा.



बीड: आर्युमर्गलम निवासी मुकबधीर विद्यालय, बीड प्रज्ञाचक्षु निवासी अंध विद्यालय, बीड रुख्माई गोविंद मतिमंद निवासी विद्यालय, पांगरी रोड बीड मतिमंद निवासी विद्यालय, वासनवाडी अनिवासी मुकबधीर विद्यालय, वासनवाडी.

माजलगांव: मतिमंद निवासी विद्यालय, माजलगांव मुकबधीर निवासी विद्यालय, माजलगांव मतिमंद निवासी विद्यालय, किट्टीआडगाव मुकबधीर नियासी विद्यालय, किट्टीआडगाव.

पाटोदा: मुकबधीर निवासी विद्यालय, तांबाराजुरी मतिमंद निवासी विद्यालय, तांबाराजूरी, मतिमंद निवासी विद्यालय, दासखेड.

वडवणी: साईनाथ मतिमंद निवासी विद्यालय, नाथापुर मतिमंद निवासी विद्यालय, संभाजी नगर बीड अस्थिव्यंग निवासी विद्यालय, नेकनुर मुकबधीर निवासी विद्यालय, नेकनूर.

आष्टी: छत्रपती शाहू महाराज मुकबधीर निवासी विद्यालय, आष्टी छत्रपती शाहू महाराज अस्थिव्यंग निवासी विद्यालय, आष्टी श्रेया मतिमंद निवासी विद्यालय, कारखेल,

धारूर: मतिमंद निवासी विद्यालय धारुर अस्थिव्यंग निवासी विद्यालय, धारुर मुकबधीर निवासी विद्यालय, धारुर मतिमंद निवासी विद्यालय, बीड रोड धारुर.

परळी: मानवविकास मुकबधीर निवासी विद्यालय, अंबाजोगाई मानवविकास मतिमंद निवासी विद्यालय, अंबाजोगाई मानवविकास अस्थिव्यंग निवासी विद्यालय, अंबाजोगाई मुकबधीर निवासी विद्यालय, परळी कर्तव्य मतिमंद निवासी विद्यालय, अंबाजोगाई मतिमंद निवासी विद्यालय, शिरुर: मतिमंद निवासी विद्यालय शिरूर, अस्थिव्यंग निवासी विद्यालय तळेगाव, ता.बीड.

गेवराई: अस्थिव्यंग निवासी विद्यालय, तळेगाव ता. जि.बीड के.केशवरावजी धांडे मतिमंद निवासी विद्यालय, तलवाडा ता.गेवराई मतिमंद निवासी विद्यालय, गेवराई प्रौढ मतिमंद निवासी कार्यशाळा, तलवाडा

# कृषी मित्र कोकाट यांनी केले शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक बाबत मार्गदर्शन

तलवाडा (प्रतिनिधी)
गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव येथील कृषी मित्र तसेच संध्या मल्टी सर्विसेस चे संचालक बाबू कोकाट यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै हा कृषी दिन म्हणून साजरा करण्यात येतो त्यानिमित्त संध्या मल्टी सर्विसेस ठाकर आडगाव मध्ये




कृषीदिन साजरा केला.व कृषी दिनाच्या निमित्ताने शेतकरी बांधवांसाठी शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले यावेळी प्रगतीशील शेतकरी यांचा सन्मान तसेच शेतकरी बांधवांना १ जुलै पासून सुरू होणाऱ्या प्रधानमंत्री पिक विमा तसेच फॉर्मर आयडी ॲग्रिस्टॅक नोंदणी आणि ई-पीक पाहणी, महाडीबीटी मधील योजनेची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.

विशेष करून सर्व शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढून घ्यावा, असे आवाहन कृषी मित्र बाबू कोकाट यांनी केले आहे. यापुढे फार्मर आयडी नसल्यास शेतकऱ्यांना शासनाच्या कृषी विषयक विविध योजनांचा लाभ मिळणे बंद होणार आहे. याबाबत कृषी विभागाने सांगितले आहे तसेच

ज्या शेतकऱ्यांच्या नावावर ७/१२ उतारा आहे अशा सर्व शेतकऱ्यांनी आपल्या गावातील किंवा जवळील सीएससी केंद्रांशी संपर्क साधून तात्काळ फार्मर आयडी तयार करून घ्यावा प्रत्येक नागरिकाची ओळख जशी आधारकार्ड द्वारे होते, त्याचप्रमाणे शेतकरी असल्याची अधिकृत ओळख फार्मर आयडीद्वारे होणार आहे. यामुळे शासनाच्या कृषी विषयक सर्व योजना, सवलती आणि लाभ मिळवण्यासाठी फार्मर आयडी अत्यावश्यक आहे.फार्मर आयडी नसल्यास पीएम किसान सन्मान निधी,नमो शेतकरी महासन्मान निधी, पिक विमा,अश्या अनेक शासनाच्या योजना शेतकऱ्यांना फार्मर आयडी शिवाय मिळताना अडचण येऊ शकते अशी माहिती कृषी मित्र तसेच संध्या मल्टी सर्विसेस चे संचालक बाबू कोकाट यांनी दिली.यावेळी गावातील शेतकरी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नाशिक ला आदिवासी सेनेचा विभागीय महसूल आयुक्त कार्यालयावर बांगडी मोर्चा

नाशिक / प्रतिनिधी
नाशिक-: देशातील तसेच विविध प्रदेशातील, राज्यातील विविध जिल्ह्यातील समस्यांवर अनेक मागण्या प्रलंबित आहेत, त्याकरिता अखिल भारतीय आदिवासी सेनेच्या वतीने महसूल आयुक्त कार्यालयावर बांगडी मोर्चा काढण्यात आला.अप्पर आयुक्त अरविंद लोखंडे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आदिवासी समाजातील व दुर्लक्षित भागातील महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा, सुशिक्षित व अशिक्षित महिला पुरुषांना सरकारी, निम सरकारी खासगी क्षेत्रात रोजगार देण्यात यावा, शासनाने घरकुलांची योजना निर्माण केली या घरकुलांचा लाभखऱ्या लाभांर्थी यांना मिळावा, घरकुलातील वशिलेबाजी बंद करण्यात यावी, घरकुलासाठी शासकीय अनुदान नियमित देण्यात

यावे, शेतक-यांची कर्जमाफी



जलदगतीने करावी, ज्येष्ठ नागरिकांना बंद केलेले तिकिटांची सुविधा त्वरित सुरू करावी, महसूल खात्यात तलाठी कार्यालयात तोंड पाहून काम करण्याची पद्धत बंद करावी, आदिवासी जमिनी प्लॉट बिगर आदिवासींनी घेतलेले असतील तर ते तातडीने मूळ आदिवासींना त्यांच्या नावे करण्यात यावी व खरेदी-विक्री करणाऱ्यांवर

तातडीने कारवाई करावी, नगरपालिका,महानगरपालिका ग्रामपंचायतीमधील महसूल विभाग अथवा राज्य व केंद्र सरकार विभागात काम करणाऱ्या सफाईकामगारांच्या सेवा तसेच कृषी खात्यातील अथवा कामगारांच्यआकस्मित मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस कायम सेवेत घेण्यात यावे, आदी मागण्याकरिता हा मोर्चा काढण्यात आला.

दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी मोर्चात सेनेचे संस्थापक अध्यक्ष दि. ना. उघाडे, राजाराम ठाकरे, सुनीता कांबळे, भगवान कांबळे, मंगला राऊत, बाळू मोरे, भागवत कांबळे, शीतल बोरसे, कारभारी गिर, सपना करंजकर, अनुसया आगविले, भारती बीर, यशोदा वीर आदींसह

# चकलांब्यात वाळू तस्करावर कारवाई २७ लाखांचा मुद्देमाल जप्त

चकलांबा । प्रतिनिधी
पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्यांवर कठोर कारवाईच्या दिलेल्या आदेशानुसार चकलांब्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी पुन्हा वाळू तस्करांवर कारवाई केली आहे.गोदापात्रात केलेल्या या कारवाईत २७ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी ठाण्यात १) विकास संपत केसभात रा. गायकवाड जळगाव २) मोहम्मद अहमद शेख रा. सुकली रा. शेवगांव जिल्हा अहिल्यानगर अश्या जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चकलांब्या हद्दीत सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी मागच्या काही दिवसांत वाळू तस्करांवर मोठ्या कारवाया केल्या आहेत.बुधवारी (दि.२) महारटाकळी येथे नदी पात्रात एक ट्रॅक्टर चोरटी वाळू वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार पाटील यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना करत कारवायाचे आदेश दिले.त्यानुसार पोलिसांनी छापा मारला असता यावेळी वाळू तस्करी करणारे टॅक्टर व एक जेसीबी आढळून आले.त्यानुसार दोन्ही वाहने ठाण्यात



आणण्यात आली असून या कारवाईत २७ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत,अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,पोलीस उपअधीक्षक श्री.राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील पोह/१५३३ अमोल अंकुश येळे पोशी / २००४ कैलास विठ्ठल खटाने पोशी/२३१ प्रशांत कल्याण घोंगडे आदींनी केली आहे.

# विरा फाऊंडेशन च्या माध्यमातून राहुल घोबाळे यांचे कार्य कौतुकास्पद; नितीन समशेट्टे

परळी / प्रतिनिधी
विरा फाऊंडेशन च्या माध्यमातून राहुल घोबाळे यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन भाजपा नेते नितीन समशेट्टे यांनी विरा फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित शालेय साहित्य वाटप कार्यक्रमात केले.

सामाजिक कार्याचा वसा घेऊन मागील तीन वर्षांपूर्वी राहुल घोबाळे यांनी विरा फाऊंडेशन या सामाजिक संस्थेची स्थापना केली. या संस्थेचा ४ था वर्धापन दिन मंगळवार, १ जुलै रोजी साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद शाळेत या निमित्ताने विद्यार्थाना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी २०० विद्यार्थ्यांना वही, पेन, दप्तर सह शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना भाजपा नेते नितीन समशेट्टे यांनी राहुल घोबाळे यांच्या विविध सामाजिक कार्याची कौतुक केले. विरा फाउंडेशन च्या माध्यमातून सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा, क्रिकेट स्पर्धा, गरजूंना विविध माध्यमातून मदत



अश्या विविध सामाजिक कार्याची दखल घेण्यात येईल व हे कार्य अनेकांना प्रोत्साहित करेल असे गौरवोद्गार यावेळी काढले.

यावेळी जेष्ठ रिपाई नेते आर एच आण्णा व्हावळे, राष्ट्रवादी काँग्रेस नेते माधव ताटे, जेष्ठ नेते राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार उत्तमदादा माने, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, कामगार नेते भाई गौतम आगळे, जेष्ठ नेते विश्वनाथ गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेच्या शहरअध्यक्षा प्रजावती ताई कांबळे, भाजपाचे अश्विन मोगरकर यांनी मनोगत व्यक्त केले.विरा फाउंडेशन च्या शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा दासू वाघमारे सरांनी अध्यक्षीय समारोप करत विरा फाउंडेशनच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी विरा फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष राहुल घोबाळे यांनी संस्थेच्या आत्तापर्यंत केलेल्या कार्याचा आढावा मांडला. यावेळी विरा फाउंडेशनच्या वतीने पँथर नेते बौद्धवासी धम्मानंदजी मुंडे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने ११ ऑगस्ट रोजी पँथर चळवळीत कार्य केलेल्या जेष्ठ नेत्यांचा समाजभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. गौरवमूर्ती म्हणून नामदेवराव रोडे गुरुजी (आदर्श शिक्षक पुरस्कार) गंगाधर अप्पा रोडे, प्रा. दासु वाघमारे सर, बाबुराव साळवे, भास्कर नाना रोडे, माधव ताटे, भाई गौतम आगळे, विश्वनाथ गायकवाड, सोपान ताटे, राजाभाऊ उमाजी रोडे, सीमाबाई कांबळे, भीमराव मुजमुले यांच्या नावाची राहुल घोबाळे यांनी घोषणा केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विरा फाउंडेशन चे मनोहर मुंडे यांनी तर आभार प्रदर्शन सुरेश रोडे यांनी केले.

या कार्यक्रमास बाबासाहेब शिंदे महेंद्र रोडे शमी शेख खदीर भाई शरण मस्के राजेंद्र ओझा रमेश गायकवाड जितेंद्र मस्के शिवाजी देशमुख अमर सूर्यवंशी धम्मा क्षीरसागर दत्ता जाधव बाबा कांबळे अरविंद धीवार विकास जाधव योगेश मुंडे जनाब फिरोजभाई रणजीत नाना सरोदे भगवान सोपान गायकवाड भगवान सिताराम गायकवाड राहुल पैठणे अशोक पोटभरे उपस्थित होते.

# पोलिसांच्या अनुकंपा नियुक्त्यांचा निर्णय तातडीने निकाली काढणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई,/ प्रतिनिधी
राज्य शासनाच्या १५० दिवस आराखडा कार्यक्रमात पोलिसांच्या अनुकंपा भरती संदर्भातील सर्व प्रकरणे मिशन मोडवर निकाली काढली जातील. त्याचबरोबर अनुकंपा भरतीसंदर्भात सर्व विभागांना आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.विधानपरिषद सदस्य सुनील शिंदे यांनी पोलिसांच्या कामकाजातील सुधारणा, गृहनिर्माण, आरोग्य, मानसिक आरोग्य व इतर सुविधांच्या संदर्भात प्रश्न विचारला होता. या चर्चेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे, संजय खोडके, भाई जगताप, बंटी पाटील या सदस्यांनीही सहभाग घेतला.पोलिसांच्या ड्युटीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, सर्वप्रथम मुंबईतच ८ तासांची ड्युटी ही संकल्पना लागू करण्यात आली. काही वेळा सण-उत्सव किंवा बंदोबस्ताच्या वेळी यात अपवाद असतात, तरीही एकूणच पोलिसांची ८ तासाची ड्यूटी आता स्थिर झाली आहे. तसेच पोलिसांना साप्ताहिक सुट्टी देण्याची सुरुवात राज्यभर झाली असून, काही कारणास्तव सुटी न मिळाल्यास त्याचे 'एनकॅशमेंट'ही मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आले आहे. आधी ही एनकॅशमेंटची रक्कम कमी होती, ती आता वाढवली असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुंबईसह राज्यभरात पोलिसांसाठी मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण प्रकल्प राबवले जात आहेत. तालुका स्तरावरही काम वेगाने सुरू आहे. पोलिस गृह निर्माण महामंडळाचे काम अभूतपूर्व असल्याचे त्यांनी नमूद केले. डीजी लोन योजनेचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ही योजना सुरू केली होती. मात्र, नंतरच्या सरकारच्या काळात ती बंद झाली होती. आता नव्याने ती योजना पुन्हा सुरू करण्यात आली असून, बॅकलॉग निकाली काढण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.पोलिसांमध्ये जीवनशैलीशी संबंधित वाढणाऱ्या आजारांवर लक्ष देत, ४० वर्षांवरील पोलिसांसाठी वर्षातून एकदा आणि ५० वर्षांवरील पोलिसांसाठी वर्षातून दोनदा आरोग्य तपासणी अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच, पोलिसांच्या मानसिक आरोग्यासाठी काउन्सिलिंग व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवादाची विशेष योजना राबवली जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी उत्तरात सांगितले की, नवी मुंबईत पोलिसांसाठी उभारण्यात आलेल्या दहा हजार क्षमतेच्या सदनिकेसाठी शासनाने सहकारी सोसायटीला सर्वतोपरी मदत केली. अशा प्रकारे सहकार्याने पोलिस एकत्र आले तर त्यांच्या गृहनिर्माणासाठी शासनाची संपूर्ण मदत मिळेल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

यासंदर्भात अधिक माहिती देताना गृह राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, मुंबई व महाराष्ट्र पोलिस दलात गेल्या काही वर्षांत हृदयविकार, कर्करोग, आत्महत्या अशा विविध कारणांमुळे पोलीस कर्मचाऱ्यांचे मृत्यू झाले. यात कार्डियाक अरेस्टमुळे ७५ मृत्यू, कर्करोगामुळे ६ मृत्यू तसेच गेल्या चार वर्षांत २५ आत्महत्या झाल्या त्यात काही कौटुंबिक वादामुळे, इतर कारणांमुळे ३ आणि डिप्रेशनमुळे १ मृत्यू झाले असल्याची माहिती त्यांनी दिली.पोलिसांच्या कल्याणासाठी शासन अनेक उपाययोजना राबवत असून यात ४० प्रकारच्या आजारांवर मोफत उपचार केले जात आहेत. यासाठी राज्यात २७० हॉस्पिटल्ससोबत टायअप करण्यात आले आहे. टाटा मेमोरियल व ए.के. मेहता यांच्यासोबत कॅन्सर तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. त्याचबरोबर पोलिसांसाठी योगा, ध्यानधारणा व व्यायामशाळा सुरू करण्यात आली असल्याचे गृह राज्यमंत्री श्री.कदम यांनी यावेळी सांगितले.

## घरकुलांसाठी स्थानिक वाळू घाटांमधून
# पाच ब्रास वाळू तहसीलदारार्फत मोफत मिळणार

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे
मुंबई / प्रतिनिधी
राज्य शासनाने राज्यात एक व्यापक वाळू धोरण लागू केले आहे. या धोरणाअंतर्गत घरकुलांसाठी स्थानिक वाळू घाटांमधून पाच ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तहसीलदारांमार्फत ही वाळू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवली जाणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत दिली.विधानपरिषद सदस्य सर्वश्री दादाराव केचे, शशिकांत शिंदे, ड.अनिल परब यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.

वर्धा जिल्ह्यातील देऊरवाडा येथे अवैध वाळू साठ्याचा तपास केला होता. त्यानंतर संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, मोठ्या प्रमाणात साहित्य जप्त करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या साहित्यांमध्ये नदीतून चोरटी वाळू काढण्यासाठी वापरले जाणारे लोखंडी ड्रम, पाईप, चाळण्या, टोपले आदींचा समावेश आहे. या प्रकारावर कारवाई करताना संबंधित व्यक्तींना अटक करण्यात आली असून, शासनाच्या सूचनेनुसार दोषी तलाठी व महसूल निरीक्षकांना निलंबित करण्यात येणार असल्याचेही महसूल मंत्र्यांनी यावेळी सांगितले.शासनाने वाळू चोरी रोखण्यासाठी आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात एम.सी.आर.डी.ओ. धोरण लागू करून प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर युनिट्स सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे नैसर्गिक वाळूवरील अवलंबित्व कमी होईल आणि वाळूचा तुटवडा कमी करून काळाबाजाराला आळा बसेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.स्थानिक ग्रामपंचायती, नगरपंचायती व खासगी बांधकामांसाठी देखील ठराविक दराने वाळू उपलब्ध करून देण्याची योजना असल्याचे सांगून महसूलमंत्री श्री.बावनकुळे म्हणाले की, या सर्व प्रक्रियेचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले असून, हे पोर्टलमार्फत पारदर्शकपणे राबवले जाणार आहे.गृह व महसूल खात्यांनी संयुक्त निर्णय घेतला आहे की, वाळू चोरीसंदर्भात महसूल किंवा पोलीस यांपैकी कोणाकडेही गुन्हा दाखल झाला असेल तरी दोन्ही विभाग हे संयुक्त कारवाई करतील, असे श्री.बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

# दिंडोरी चे खासदार भगरे सर पंढरपूरवारीत सहभागी

नाशिक / प्रतिनिधी
नाशिक-: दिंडोरी खासदार भास्कर भगरे यांनी पंढरपूर आषाढीवारीत सहभागी होऊन पंढरपूर येथेश्रीविठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.आषाढी एकादशीच्या पाश्र्वभूमीवर महाराष्ट्रातून विविध ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात वारकरी दिंडीच्या माध्यमातून पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनाला जातात. या वारीत दिंडोरीचे खासदार भास्कर भगरे यांनी पंढरपूर वारीत सहभागी झालेल्या विविध पालख्यांना भेटी देत वारकरी मंडळ यांचेशी संवाद साधला. दिवसभरात त्यांनी तुकाराम महाराज खायदे कर (मालेगाव), जीवनेश्वर काळुबाबा महाराज खेडगाव (दिंडोरी), दराडे महाराज राजापूर (येवला), पाटील बाबा महाराज जोपूळ (दिंडोरी) दामोदर महाराज खेडगाव (दिंडोरी), कालू बाबा आश्रम शिंदवड(दिंडोरी), संतश्रेष्ठ निवृत्तिवराध महाराज ज्यंबकेश्वर (नाशिक) आदींसह विविध दिंड्यांना भेटी देऊन



वारकरी मंडळाचे व्यवस्थेची चौकशी केली.

करमाळा येथील स्थानिक कार्यकर्ते संतोष बारे व जेऊर येथील करमाळा विधानसभा आमदार नारायण आबा पाटील व सरपंच पृथ्वीराज पाटील यांचे मदतीने दिंडीमध्ये सहभागी झालेल्या वारकरी बंधू-भगिनीच्या वास्तव्याच्या संदर्भातील सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. कित्येक किलोमीटर पायी चालून दिंडी मधल्या वारकर्यां सोबत भजनाचा आणि वारीचा आनंद घेतला. त्यानंतर त्यांनी पंढरपूर येथे जाऊन श्री विठ्ठलाचे दर्शन घेतले. सलग दोन दिवस खासदार भास्कर भगरे यांनी पंढरीच्या आनंदवारीत सहभागी झालेल्या महाराष्ट्रातील इतरही दिड्यांतील वारकर्यांच्यां गाठीभेटी घेत संवाद साधला,

# मुख्याध्यापक गोरखनाथ कुणगर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित
## विविध क्षेत्रातील ७० मान्यवर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

निफाड । प्रतिनिधी
नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तसेच न्यू दारणा हायस्कूलचे आदर्श मुख्याध्यापक गोरखनाथ वामनराव कुंजर यांना शैक्षणिक ,अध्यापन तसेच प्रशासकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल मनु मानसी महिला बहुउद्देशीय संस्था व महावीर इंटरनॅशनल नासिक यांच्या वतीने मानाचा व सन्मानाचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

मनु मानसी महिला बहुउद्देशिय सेवाभावी संस्था आणि महावीर इंटरनॅशनल यांच्या संयुक्त विद्यमाने जोशी नर्सरी शेजारी व के के वाघ कॉलेज समोर मुंबई आग्रा- हायवे नाशिक ३ द पवार गार्डन मध्ये जीवन गौरव पुरस्कार सन्मान सोहळ्याचे



आयोजन आले होते. जीवन गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात कार्यक्रमाचे अध्यक्ष प डॉ शेफाली ताई भुजबळ, भुजबळ नॉलेज सिटी सर्वेसर्वा ,श्री सुनील पवार सर पोलीस निरीक्षक क्राईम ब्रांच नाशिक, महंत भक्ती चरणदासजी महाराज अ.भा आखाडा परिषद राष्ट्रीय प्रवक्ता ,राम डावरे सर सी ए, डॉ.विठ्ठल सिंग ढाकरे सर, सौ मेघाताई राजेश शिंपी मनू मानसी संस्थापिका अध्यक्ष ,डॉ.अनिल नहार महावीर इंटरनॅशनल नाशिक, श्रीमती मंजू जाखाडी कार्याध्यक्ष नाशिक या मान्यवरांच्या हस्ते मुख्याध्यापक गोरखनाथ कुणगर व सौ मीराताई कुणगर यांना सपत्नीक ट्रॉफी, सर्टिफिकेट देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे.

यावेळी धर्माचार्य ह भ प निवृत्ती महाराज रायते खडक माळेगाव, साई धनवर्षा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संजय देशमुख, वारकरी संप्रदाय स्टार प्रचारक व प्रसारक पत्रकार रामभाऊ आवारे सर, पत्रकार डॉ श्याम जाधव ,पत्रकार रामचंद्र ताठे ,पत्रकार अशोक पगारे, पत्रकार मुकुंद आव्हाड, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर आवारे, दैनिक युवा मराठा चे अंशुराज राजेंद्र पाटील, नित्यानंद ताम्हणकर आदींना विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# पत्रकारितेचे व्रती-तपी: मामा परमानंद!

(३ जुलै:मामा परमानंद जयंती विशेष)

नारायण महादेव उर्फ मामा परमानंद यांचे संपादकीय कौशल्य वाखाणण्याजोगे होते. राज्याकारभारविषयक प्रश्न समतोलपणे व योग्य प्रमाणात हाताळण्यात त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा होता. जनतेच्या अडचणींची चौकशी करून त्याचा निर्भीडपणे पाठपुरावा केला जाई. प्रश्नाचा निट विचार करून, त्याच्या सगळ्या बाजू समजून, त्यावर मोजक्या शब्दात पण ठामपणें मतप्रदर्शन करणे, अशी त्यांची भूमिका असे. पत्रकारितेचे हे व्रत त्यांनी कुठलीही अपेक्षा न ठेवता स्वीकारले होते. न्यायमूर्ती रानडे त्यांचा उल्लेख आमचे राजकीय ऋषी, असा करत. त्यांच्याबद्दल महत्त्वपूर्ण संकलित माहिती श्री एन. के. कुमार से.नि.अध्यापक देताहेत... संपादक.

मुंबईतील नामवंत कायदेपंडित रावसाहेब विश्वनाथ मांडलिक यांना लेखनाची विशेष आवड होती. परंतु त्यांच्याकडे वृत्तवत्र चालवण्याइतपत भाग-भांडवल नव्हते. आपला मानस बोलून दाखवताच दादाभाई नौरोजीनी मदतीचे आश्वासन दिले. या पत्राची आर्थिक बाजू मंडलिक आणि कृष्णाजी मुलजी यांनी स्वीकारली. संपादकीय जबाबदारी नारायण महादेव उर्फ मामा परमानंद यांच्यावर सोपवण्यात आली. अशा रीतीने नेटिव्ह ओपिनियनचा पहिला अंक दि.४ जानेवारी १८६४ रोजी प्रसिद्ध झाला. याची पूर्ण संपादकीय जबाबदारी मामा परमानंद यांच्यावरच होती. दोनशे रुपये महिना पगारावर त्यांची नियुक्ती झाली. दोन वर्षे इंग्रजीतून निघाल्यानंतर दि.१ जुलै १८६६पासून हा अंक मराठीतूनही निघू लागला. युरोपियन आणि नेटिव यांच्यातील गैरसमज दूर करण्यासाठी हे पत्र सुरू झाले. हिंदी राजकारणाचा त्यांना सखोल अभ्यास होता. महाराज सयाजीराव गायकवाड, सर विल्यम वेडरबर्न, रानडे, तेलंग, चंदावरकर, मलबारी, मोतीलाल घोष वगैरे ख्यातनाम मंडळी त्यांचा सल्ला घेत असत. साधुशील- सत्प्रवृत्तीचे मामा मुंबई प्रार्थनासमाजाचे एक ध्येयनिष्ठ, निष्ठावंत व समर्पित कार्यकर्ते होते. बिछान्यास खिळून असतानाही त्यांनी शेवटपर्यंत सुबोध पत्रिकेसाठी लेखन केले. ते एक कृतिशील धर्मी व समाजसुधारक होते. धर्म सुधारल्याशिवाय आपल्या देशाची सर्वांगीण उन्नती होणार नाही, असे त्यांचे ठाम मत होते. बेन्जामिन फ्रँक्लिनच्या चरित्राचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव होता. न्या.रानडे यांनी त्यांना राजकीय ऋषी या महनीय पदवीने गौरविले. मामांचा अवघा संसार परमार्थावर आधारलेला होता. त्यांचे घर म्हणजे विद्यार्थ्यांचे आश्रयस्थान, अनेक परस्थ थोर थोर पुढाऱ्यांच्या व पाहुण्यांच्या वर्दळीचे ठिकाण व पुनर्विवाहितांचा आश्रम असेच होते. त्यांच्या पत्नी जानकीबाई यांनी सहधर्मचारिणी या नात्याने त्यांना अखेरपर्यंत चांगली साथ दिली. मामांचा स्वभाव प्रसिद्धीविन्मुख व सोशिक होता.

मामा परमानंद हे प्रार्थना समाजाचे एक संस्थापक व संवर्धक होते. त्यांचा जन्म दि.३ जुलै १८३८ रोजी कोकणात सावंतवाडी नजिकच्या माणगाव या खेड्यात झाला. त्यांचे संपूर्णनाव नारायण महादेव परमानंद; तथापि मामा परमानंद याच नावाने ते प्रसिद्ध आहेत. मामांचा जन्म झाल्यावर वडील महादेव दुसऱ्या वर्षीच वारले. आई गंगाबाई हिने तिच्या भावाच्या मदतीने असलेले दुकान चालवून मामांचे प्राथमिक शिक्षण केले. दहाव्या वर्षी मामा मुंबईस बहिणीकडे गेले असताना त्यांची हुशारी व महत्त्वाकांक्षा पाहून त्यांचे मेहुणे कृष्णशेट तिरवेकर यांनी पुढील शिक्षणार्थ त्यांना मुंबईसच ठेवून घेतले. पूर्वी अत्यंत गरिबीत झालेले अर्धवट मराठी शिक्षण पूर्ण करून मामा सरकारी सेंट्रल स्कूलमध्ये चार वर्षे शिकले. पुढे कॉलेजातही गेले. मेहनती व जात्याच बुद्धिमान विद्यार्थी असल्यामुळे त्यांनी अनेक शिष्यवृत्त्या मिळवून पहिल्या वर्गातील स्कॉलर म्हणून लौकिक संपादन केला. मुंबई विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर मॅट्रिकची परीक्षा देऊन ते बीए परीक्षेसही बसले होते; पण आर्थिक अडचणीमुळे त्यांना शिक्षण सोडावे लागले आणि एल्फिन्स्टन हायस्कुलात शिक्षकाची नोकरी धरावी लागली. तेथे उत्कृष्ट शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक झाला. त्यांच्या हाताखाली नामवंत अनेक विद्यार्थी तयार झाले. उदा- प्रसिद्ध संशोधक काशिनाथपंत तेलंग हे त्यांचेच विद्यार्थी होत. पुढे सिंधमध्ये बदली झाली, तिकडेही त्यांनी उत्तम काम केले; पण हवा न मानवल्यामुळे मुंबईसच यावे लागले. शिक्षकी पेशा सोडून वृत्तपत्र संपादन व लेखन या सार्वजनिक क्षेत्रात त्यांनी आमरण मोठे यश व कीर्ती मिळविली. इंदुप्रकाश, नेटिव ओपिनिअन, इंडियन स्पेक्टॅटर व विशेषतः सुबोध पत्रिका- मुंबई प्रार्थना समाजाचे मुखपत्र या वृत्तपत्रांची जबाबदारी अंगावर घेऊन ती निर्भीड व निःस्पृहपणे पार पाडली. मामांचे इंग्रजी भाषेवर चांगले प्रभुत्व होते. त्यांचे लेखन सुबोध, चटकदार, मार्मिक व निश्चयात्मक मते मांडणारे होते. दैनंदिन राजकीय घडामोडींवरील त्यांची टीका भारदस्त व न्यायनिष्ठुर असे. तत्कालीन अनेक भ्रष्टाचारी प्रकरणांवर त्यांनी प्रकाशझोत टाकला; यूरोपिअन अंमलदारांचा देखील बेबंदपणा त्यांनी उघडकीस आणला व हाच रोष त्यांना सरकारी नोकरीत नडला. संस्थानी कारभार व त्याची सुधारणा यावरही मामांनी अभ्यासपूर्ण लेख लिहिले. कच्छच्या संस्थानिकाने त्यांना नायब दिवाण नेमले. तेथील गुंतागुंतीचा कारभार मामांच्या सरळ, शांत व सभ्य स्वभावाला मानवला नाही आणि राजीनामा देऊन ते मुंबईस परत आले. हिंदी लोकांचे मित्र व हितचिंतक सर विल्यम वेडरबर्न हे मामांची योग्यता व कार्यक्षमता जाणणारे होते. त्यांनी ते मुंबई उच्च न्यायालयात प्रबंधक असताना मामांना उपप्रबंधक म्हणून नेमले. पुढे त्यांनीच मामांना मजूर खात्याचे सेक्रेटरी केले. नंतर मामा महसूल व सामान्य खात्याचे अधिक्षक देखील झाले. पण कामाच्या ताणामुळे त्यांची प्रकृती बिघडली व शेवटपर्यंत त्यांना घरीच बिछान्यावर खितपत पडून रहावे लागले.

तरुणास उपदेश-पितृबोध, त्याच्या इंग्रजी, मराठी व गुजराती भाषेतही आवृत्त्या निघाल्या. मामांची एका संस्थानिकास बारा पत्रे- मूळ इंग्रजी १८९१- मराठी भाषांतर १९६३, एचए, क्वर्थ यांना मराठी पोवाडे संकलित करण्याच्या कामी त्यांनी बहुमोल सहकार्य केले. त्यांचा उपलब्ध असलेला इंग्रजी व मराठी पत्रव्यवहार आजही महत्त्वाचा आहे. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी मामांची योग्यता व कार्य चांगले जाणले होते. महात्मा जोतीराव फुले यांच्या शेवटच्या आजारात आर्थिक साह्य मिळावे, म्हणून बडोदे सरकारला मामांनी लिहिलेली पत्रे फुलेंच्या चरित्रावर व कार्यावर चांगला प्रकाश टाकणारी ठरली आहेत. सर्व वर्ग व सर्व थरांतील समकालीन मोठमोठ्या कर्त्या पुढाऱ्यांचे ते सल्लागार होते. मुंबईस त्यांच्या राहत्या घरी वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी दि.१३ सप्टेंबर १८९३ रोजी त्यांचे देहावसान झाले. त्यावेळी मित्र व सहकारी डॉ.रामकृष्ण भांडारकर, शांताराम विठ्ठल, तुकाराम तात्या, नारायण चंदावरकर, भास्कर हरि भागवत, श्रीधरपंत भांडारकर वगैरे जीवाभावाची मंडळी सभोवती जमलेली होती.

!! जयंतीच्या पावन पर्वावर विनम्र अभिवादन !!

श्री एन. के. कुमार, से.नि.अध्यापक.
गडचिरोली, फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

# सहकार महर्षी बळवंतराव कदम यांच्या पुण्य स्मरणार्थ गुणवंतांचा कौतुक सोहळा संपन्न



बीड ।शहाजी भोसले

येळंबघाट येथील बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज दिनांक २ जुलै २०२५ रोजी बीड जिल्ह्यातील शिक्षण महर्षी, सहकार महर्षी व श्री नारायणगड शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कै. बळवंतराव बलभीमराव कदम यांची पुण्यतिथी सन २०२४.२०२५ मधील विविध क्षेत्रातील गुणवंत आणि यशवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव त्यांच्या पालकांसह सत्कार समारंभ आयोजित करून अत्यंत उत्साहात व कृतज्ञता पूर्वक साजरी करण्यात आली. प्रशालेच्या प्रांगणात पार पडलेल्या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री.राजकुमार कदम यांची तर कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री.मधुकर तोडकर ,विद्यालयाचे सेवा निवृत्त प्राचार्य श्री भोसले टी टी ,श्री कदम आर एन, श्री.टेकाळे जे डी, प्रा.सोंडगे एस आर, प्रा रा का कदम ,लिपिक श्री घाटे सुबराव , श्री वाघ एम एस, सेवक श्री कदम दादासाहेब ,श्री कदम दत्तात्रय यांची उपस्थिती होती. तर नुकतेच सेवा निवृत्त झालेले प्राचार्य श्री खाकरे बी के यांची सेवा पूर्ती निमित्त विशेष गौरव सोहळ्यात सन्मामनीय उपस्थिती होती. श्री नारायणगड शिक्षण प्रसारक मंडळाचे आदरणीय सचिव श्री दिनकर रावजी कदम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या त्रिवेणी सोहळ्याची सुरुवात कै. बळवंतराव कदम, थोर विधी विधीज्ञ व मराठवाड्यातील आद्य शिक्षण महर्षी समाजसुधारक बलभीमराव कदम आणि विद्येची आद्य गुरु सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने व दीप प्रज्वलनाने मंचावरील सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. याप्रसंगी बळवंतराव कदम साहेबांच्या शिक्षण, सहकार ,राजकीय, समाजसेवा अशा अनेकविध क्षेत्रातील बहुमूल्य योगदानाचे स्मरण म्हणून प्रशालेतील इयत्ता बारावी कला व विज्ञान शाखेतील गुणवंत, इयत्ता दहावी तील ९०%पेक्षा अधिक गुण घेणारे विद्यार्थी, चित्रकला व क्रीडा स्पर्धेतील जिल्हा आणि विभाग स्तरावरील यशस्वी विद्यार्थी, ५ वी आणि ८वी स्कॉलरशिप, छचचड, छएएढ, चे पात्र विद्यार्थी वर्षातील आदर्श विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील सेवेत नियुक्त माजी विद्यार्थी यांचा, त्यांच्या पालकांसह शाल ,श्रीफळ, पुष्पगुच्छ , व रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. संपूर्ण सत्कार सोहळ्यासाठी अनमोल योगदान श्री अरुण चादर , प्रा श्री भास्कर चादर ,शिक्षक श्री स्वामी विकास, प्रा श्री वीर अशोक, कलाशिक्षक श्री सोनटक्के एस डी आणि श्री कांबळे डी आर यांचे रोख पारितोषिक, विविध ट्रॉफी आणि प्रमाणपत्रासाठी लाभले.तर श्री नारायणगड शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने शालेय गणवेश आणि शालेय साहित्याचे विद्यार्थ्यांना वाटप देखील यावेळी करण्यात आले. याप्रसंगी बळवंतराव कदम साहेबांच्या अलौकिक जीवन कार्यावर प्रकाश टाकताना प्रा सोंडगे बी बी यांनी बळवंतराव कदम यांच्या दातृत्वाची व स्वाभिमानाची उदाहरणे दिली तर श्री भोसले सरांनी कदम साहेबांच्या तळागाळा पर्यंत शिक्षण गंगा प्रवाहित करण्याच्या ध्यासाचे स्मरण केले.तोडकर साहेबांनी बालाघाटा वरिल उच्च गुणवत्ते बद्दल प्रशालेचे कौतुक केले .तर अध्यक्षीय समारोपात श्री राजकुमार कदम यांनी सेवा निवृत्ताना संस्थेचा भक्कम पाया संबोधून गौरव केला आणि कदम साहेबांच्या उत्तुंग कार्याचे दाखले देतानाच शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विज्ञान वादी होण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक श्री चौरे व्ही एस ,संचलन श्री घाटे ए एस आणि कोल्हे एस एम तर आभार श्रीमती गणगे व्हि एम यांनी मानले.कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक, उप मुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांसह सर्व प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्येष्ठ लिपिक श्री सुधीर पायाळ यासह सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. उपस्थित सर्व मान्यवर पालक आणि विद्यार्थी यांना अल्पोपहाराचे वाटप करून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. मुख्याध्यापक बळवंतराव कदम माध्यमिक विद्यालय येळबघाट .

# गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी खाजगी कोचिंग क्लासेस समोर तक्रार निवारण पेटी बसवा

पोलीस निरीक्षकांना सामाजिक कार्यकर्ते भीमसेन लोमटे व अशोक गंडले यांचे निवेदन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी खाजगी कोचिंग क्लासेस समोर तक्रार निवारण पेटी बसवा अशी मागणी भीमसेन लोमटे व अशोक गंडले यांनी पोलीस निरीक्षक, अंबाजोगाई यांना मंगळवारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.सध्या बीड जिल्ह्यात खासगी कोचिंग क्लासेसचा विषय वाढत्या गैरप्रकारांनी पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. याबाबत अंबाजोगाई येथील सामाजिक कार्यकर्ते भीमसेन (अप्पा) दाजीसाहेब लोमटे व अशोक (भाऊ) गंडले यांनी पोलीस निरीक्षक, अंबाजोगाई यांना मंगळवार,दि.०१ जुलै रोजी



दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, खाजगी शिकवणी वर्गातील मुला-मुलींची संख्या लक्षणीय वाढलेली आहे व या अनुषंगाने गैरप्रकारांत वाढ झालेली आहे. सामाजिक भीती पोटी अन्यायग्रस्त मुले व मुली निमूटपणे सहन करतात. हे मागील काही दिवसांपासून समोर आलेल्या घटनेवरून अधोरेखित होते आहे. अशा घटनांना व अन्यायाला आळा बसविण्यासाठी आपण प्रत्येक खाजगी क्लासेस चालकांना बंद तक्रार पेटी बसविण्यास सक्तीचे करावे व सदरील तक्रार पेटीची दर ८ दिवसांनी आपल्या कार्यालयामार्फत तपासणी करण्यात यावी, जेणे करून भविष्यात घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा बसेल, कोचिंग कक्लासेसचे सी.सी.टी.व्ही फुटेज वेळोवेळी पोलिसांकडून चेक करण्यात यावेत, व तेथे पोलीस गस्त वाढविण्यात यावी जेणे करून मारामारी, छेडछाड अशा घटनांना आळा बसेल. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भीमसेन लोमटे व अशोक गंडले यांनी सदरील निवेदनातून केली आहे. या निवेदनावर भीमसेन (अप्पा) दाजीसाहेब लोमटे, अशोक गंडले, श्रीकांत कदम यांची स्वाक्षरी असून बुध्दकरण जोगदंड, शिंगणकर, महेश मगर,

# २४० दिवस सेवा बजावणाऱ्या कामगारांना नियमित करा !

## पँथर क्रांतिवीर जनरल कामगार सेनेचे कामगार आयुक्तांना निवेदनाद्वारे मागणी,

नाशिक / प्रतिनिधी

नाशिक- : राज्यभरातील कंत्राटी वअस्थायी कामगारांपैकी ज्या कामगारांनी २४० दिवसांहून अधिक सेवा केली आहे, अशा कामगारांना त्वरित नियमित करा, अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा पँथर क्रांतिवीर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विजय वाहुळे यांनी कामगार उपायुक्त विकास माळी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील हजारो कामगार वर्षानुवर्षे सरकारी आणि निमशासकीय विभागांमध्ये कंत्राटी तत्त्वावर सेवा देतआहेत. कोविडसारख्या संकटातही जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या या कामगारांना आजही ना नियमित नोकरी मिळते, ना सामाजिक सुरक्षेची हमी. कामगारांना कंत्राटी, अस्थायी आणि आऊटसोर्सिंग पद्धतीखाली पिळून काढले जात आहे, असा आरोप करतानाच हा केवळ आर्थिक शोषणाचा मुद्दा नाही, तर संविधानिक हक्कांवर आघात असल्याचे नमूद करीत २४०दिवसांहून अधिक सेवा बजावणाऱ्या कामगारांना नियमित करण्याची मागणी कामगार संघटनेने केली आहे.

पँथर क्रांतीवीर संघटना वतीने

या आहेत प्रमुख मागण्या २४० दिवस किंवा त्या हुन अधिक सेवा बजावलेल्या कंत्राटी कामगारांना नियमित करा, समान काम, समान वेतन या तत्त्वाची अंमलबजावणी करावी. आऊटसोर्सिंग पद्धती समाप्त करून थेट भरती प्रक्रिया सुरू करावी. सेवा पुस्तिका, ईपीएफ, ईएसआय, बोनस, सवलती व निवृत्ती लाभ लागू करावा.सर्व कंत्राटी व अस्थायी कामगाराची यादीव सेवाकाल सार्वजनिक करण्याचे आदेश संबंधित खात्यांना द्यावेत, नाशिक जिल्हा व महाराष्ट्र राज्यातील बंद पडलेल्या कंपन्यांचे पुनर्वसन करा, पँथर क्रांतिवीर संघटनेच्या मागण्यांवर१५ दिवसांच्या आत कार्यवाही झाली नाही, तर नाशिकसह राज्यभरात संविधानिक व शांततामय मार्गाने आंदोलन छेडले जाईल. हा लढा केवळ एका संघटनेपुरता मर्यादित न राहता, सर्व कामगार संघटनांना घेऊन व्यापक स्वरूपात लढा दिला जाईल असा इशारा पँथर क्रांतीवीर जनरल कामगार संघटना चे अध्यक्ष विजय वाहुळे,श्रमिक संघटना चे अध्यक्ष रमेश लबडे सह इतर पदाधिकारी उपस्थित होते




# सेनगाव तालुक्यातील १०७ ग्रामपंचायती सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

## जिल्ह्याची राजधानी गोरेगाव अनुसूचित जाती सर्वसाधारण राखीव) (तर कही खुशी कही गम ची परिस्थिती

सेनगाव प्रतिनिधी

सेनगाव तालुक्यातील १०७ ग्रामपंचायतीचा सरपंच पदाचा कार्यकाळ संपुष्टात येत असल्याने त्या ठिकाणी नव्याने निवडणूक घेण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून आज दिनांक २ जुलै रोजी तहसील कार्यालयाच्या प्रांगणात १०७ ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण ईश्वर चिठ्ठीद्वारे काढण्यात आल्याने तालुक्यात कुठे खुशी तर कुठे गम अशी परिस्थिती पहावयास मिळाली तर जिल्ह्याची राजधानी म्हणून ओळख असलेले गोरेगाव मात्र यावेळी अनुसूचित जाती सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव आल्याने अनेकांचे सरपंच होण्याचे स्वप्न भंग झाले असल्याचे पहावयास मिळत आहे.


सेनगाव तालुक्यातील १०७ ग्रामपंचायत ती सरपंच पदाची आरक्षण सोडत उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार तथा निवडणूक अधिकारी सखारामजी मांडवगडे, नायब तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी देवराव कारगुडे, अव्वल कारकून विनोद अंभोरे निवडणूक लिपिक सोनटक्के, संगणक ऑपरेटर विनोद चिलगर आदींच्या प्रमुख उपस्थितीत सरपंच आरक्षण सोडत पार पडली आहे

सेनगाव तालुक्यातील १०७ ग्रामपंचायतीची सरपंच आरक्षण सोडत ही अनुसूचित जाती करिता एकूण वीस ग्रामपंचायत राखीव ठेवण्यात आले असून त्यामध्ये अनुसूचित जाती महिला राखीव करिता १० तर अनुसूचित जमाती करता एकूण ७ ग्रामपंचायत आरक्षित करण्यात आले असून त्यापैकी अनुसूचित महिला करिता ४ ग्रामपंचायत कायम ठेवण्यात आले आहेत तसेच नागरिकाचा मागास प्रवर्ग ओबीसी सर्वसाधारण करिता एकूण २९ ग्रामपंचायत आरक्षित असून त्यामध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला करिता १५ ग्रामपंचाय आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत व उर्वरित ५१



ग्रामपंचायत ह्या सर्वसाधारण ओपन करता कायम असल्याने त्यामधील सर्वसाधारण ओपन महिला २५ ग्रामपंचायत ह्या राखीव ठेवण्यात आले आहेत आज १०७ ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण ईश्वर चिठ्ठीद्वारे सोडत प्रक्रिया पार पडली असून ती पुढील प्रमाणे आहे. अनुसूचित जाती सर्वसाधारण हिंगोली जिल्ह्याची राजकीय राजधानी म्हणून ओळख असलेले गोरेगाव, खुडज, खिल्लार, वटकळी, बरडापिपरी, सावरखेडा, भंडारी, शेगाव खोडके, भगवती पाटोदा. अनुसूचित जाती महिला राखीव बोरखेडी पिं, कवठा बु, वाघजाळी, हाताळा, शिवनी बु, कारेगाव, मकोडी केल्सुला, कापडसिंगी, भानखेडा.

अनुसूचित जमाती सर्वसाधारण डोंगरगाव, ब्राह्मणवाडा, सवना. तर अनुसूचित जमाती महिला राखीव कोंढवाडा, दाताडा बु, येलदरी, हनगदरी. नागरिकाचा मागास प्रवर्ग ओबीसी सर्वसाधारण कवरदडी, खडकी, गोंडाळा, जामठी बु, ताकतोडा, ब्रह्मवाडी, लिंबाळा आमदरी, वरुड चक्रपान, वलाना, वायचाळ पिंपरी, साखरा, सुकळी खु, सुकळी बु, हिवरखेडा. नागरिकांचा मागास प्रवर्ग ओबीसी महिला आरक्षित लिंबाळा हूडी, गुगल पिपरी, जाम आंध, जामदया, तांदूळवाडी, धानोरा बंजारा, पानकनेरगाव, पुसेगाव, बटवाडी, बन, वझर खु, वाढोणा, सालेगाव, शिंगी खांबा, सूलदली बु.सर्वसाधारण जनरल प्रवर्गासाठी आडोळ, आमदरी, उटी पूर्णा, उटी ब्र, कडोळी, केंद्र बु, कोळसा, गारखेडा, घोडदरी, चिचखेडा, चिखलाकर, चोंडी खु, धनगरवाडी, पळसी, बोरखेडी जी, माझोड, महाळशी, माळसापुर, रिधोरा, लिंगदरी, वरुड काजी, शिंदेफळ, सापडगाव, सिंनगी नागा, हत्ता, हिवरा माहेरखेडा.सर्वसाधारण महिला राखीव आजेगाव, कहाकर बु, कहाकर खू, केंद्रा खू, खैरखेडा, गणेशपुर, चौंडी बु, जयपुर, जवळा बु, जांभरून बु, तळणी, दाताडा बु, देऊळगाव ज, धोत्रा, पाडी पोहकर, पिपरी लिंग, बाभूळगाव, मन्नास पिंपरी, वडहिवरा, वरखेडा, वेलतुरा, शिवनी खु, साबलखेडा, सुरजखेडा, सोनसावंगी तालुक्यातील १०७ ग्रामपंचायत ती सरपंच पदाचे आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली या जाहीर सोडती प्रमाणे अनेक इच्छुक व भावी सरपंच निवडणूक कामात लागले असल्याचे पहावयास मिळाले तर अनेक भावी सरपंच गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असणारे आरक्षणामुळे अनेकांची हिरमोड झाली असल्याचे पहावयास मिळत आहे तर ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच गावागावात राजकीय पदाधिकारी निवडणूक कामी लागणार असल्याचे चित्र निर्माण होणार आहे या सरपंच आरक्षण सोडत प्रसंगी तालुक्यातील अनेक राजकीय पदाधिकारी व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती सह भावी सरपंचांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.



# बीड शहर बचाव मंचाच्या वतीने कृषी क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

हरितक्रांतीचे जनक तथा माजी मुख्यमंत्री वसंतराव जी नाईक यांची आज बीड शहर येथे संत भगवान बाबा चौक या ठिकाणी अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तसेच श्रद्धा भावाने अभिवादन करून बीड शहर बचाव मंचाच्या व व कर्मयोगी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या अनुयायांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी त्यांच्या कृषी क्षेत्राशी निगडित कार्यावर मान्यवरांच्या वतीने प्रकाश टाकण्यात आला. त्यांनी हरितक्रांतीचे जनक म्हणून संपूर्ण जगात त्यांच्या कृषी व शेतकरी हिताच्या कार्यातून ओळख निर्माण केली. त्यामुळेच संपूर्ण महाराष्ट्र आज सुजलाम सुफलाम व स्वयंपूर्ण झाला आहे. त्यांची दूरदृष्टी हे महाराष्ट्राच्या हरितक्रांतीचे धोतक आहे. यावेळी बीड शहर बचाव मंचाच्या वतीने सर्व मान्यवरांनी वर्तमान तसेच पुढील काळामध्ये माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या विचारांवर वाटचाल करत त्यांनी दाखवलेल्या मार्गाने पावलावर पाऊल ठेवून महाराष्ट्राला कृषी व औद्योगिक विकासाच्या माध्यमातुन प्रगतीपथावर नेण्यात यशस्वी होऊ असा ठाम विश्वास व्यक्त केला. कृषी क्रांती जनक माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीच्या निमित्ताने,डी.जी. तांदळे सर ,नितीन जायभाये, ड.अनिल बारगजे, मा.भूषण पवार, मीनाक्षी देवकते, लताताई राऊत, चित्रपट अभिनेते ड.महेश कुमार वनवे, बाजीराव ढाकणे, अमोल अंकुटे, काँग्रेस पक्षाचे गणेश बजगुडे, रामधन जमाले, गवते सर,अशोक लोढा,मयुरी ताई ढाकणे, जिव्हाळा बेघर केंद्राचे राजाभाऊ वंजारे, छायाताई सरोदे, अभिजीत वैद्य, बालाजी जगतकर,डॉ. संजय तांदळे,

# कर्तव्य दक्ष अधिकारी डॉ.नरेश कासट यांची दासखेड आरोग्य केंद्रास भेट!

## दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्रात वृक्ष लागवडीची पाहणी व अडीअडचणी घेतल्या जाणून

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सामाजिक कार्यकर्ते डॉ.हरिदास शेलार यांच्या प्रयत्नातून विविध प्रकारचे कार्यक्रम वेळी वेळी घेतले जातात. मागील दोन दिवसांपूर्वी दवाखाना परिसरात शोभेचे झाडे व फळ झाडे यांची लागवड करण्यात आली होती. या संदर्भात भेट दिली.व तसेच दवाखाना मधील काही अडचणी संदर्भात चर्चा झाली ते लवकरच मार्गी लाऊ असा शब्द देखील दिला.




सेवा क्षेत्रात काम करणारे आणि आपल्या कामावर निष्ठा ठेवून, समाजासाठी समर्पित असलेले अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे.ते त्यांच्या कामात प्रामाणिक असून अधिकारी कर्मचाऱ्यावर वाचून सहकार्याची भावना नेहमीच ठेवतात. अडीअडचणी जाणून घेत सर्व अडीअडचणी दूर करण्यासाठी सदैव तत्पर आहे असेही त्यांनी सांगितले, यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.नरेश कासट.वैधकिय डॉ.शरयू पडोळे, सय्यद कादर, सामाजिक कार्यकर्ते डॉ.हरिदास शेलार, गणेश मस्के, प्रदिप गोरे, राहुल चव्हाण, शेख मिनाज ताई, लखन पवार, गणेश सरडे, अश्विनी सोनवणे यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंगोली जिल्हा परिषद बहुविध प्रशाळेतील कायदेविषयक शिबीरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

हिंगोली, शिवाजी कऱ्हाळे

हिंगोली दि.०१: तालुका विधी सेवा समिती व वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश टी. एस. अकाली यांच्या मार्गदर्शनाखाली येथील जिल्हा परिषद बहुविध प्रशाळेत सोमवारी (दि.३०) अंमली पदार्थ व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदी या विषयावर कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.



जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड. अविनाश बांगर यांनी नियमित व्यायाम केल्याने शरीर सुदृढ राहते व मानसिक तणाव येत नाही तसेच अमली पदार्थ सेवन न करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हा वकील संघाचे सदस्य ॲड. अनिकेत कोकरे यांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदी व त्याबाबत मुलींनी घ्यावयाची काळजी याबाबत मागदर्शन केले.

कार्यकमास अध्यक्ष म्हणून लाभलेले दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा तालुका विधी सेवा समितीचे समन्वयक वि.म. मानखैर यांनी विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. त्यांनी मेहनत करावी व चांगले ध्येय समोर ठेवावे व यशस्वी व्हावे, असे आवाहन केले. अमली पदार्थ सेवन केल्यास मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम या विषयावर सविस्तर उदाहरणे देवून विद्यार्थ्यांना अमली पदार्थ सेवन न करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा वकील संघाचे ज्येष्ठ सदस्य एस. के. शिरसाठ, जिल्हा परिषद बहुविध प्रशाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती विशाखा सोनुने हे उपस्थित होत्या.कार्यकमाचे प्रास्ताविक व सूत्र संचलन जिल्हा परिषद बहुविध प्रशाळेचे शिक्षक शिवलींग साखरकर यांनी केले तसेच आभार प्रदर्शन अनिस शहा यांनी केले. कार्यक्रमास तालुका विधी सेवा समितीचे कर्मचारी अतुल चाटे, शितल मुंढे, शाळेचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# केज तालुक्यात गतिमंद तरुणीवर नराधमाने केला बलात्कार !

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यात एका भोळसट स्वभावाच्या गतिमंद तरुणीवर एक नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याची खळबळजनक घटना घडली आहे.याबाबतची माहिती अशी की, दि. २ जून रोजी एक २५ वर्षाची भोळसट स्वभावाची गतिमंद तरुणी ही तिच्या भावजई सोबत भावाच्या लहान मुलाला डोस देण्यासाठी आरोग्य उपकेंद्रात जात असताना त्यांच्या रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतातील गोठ्यात थांबली होती आणि तिची भावजई ही जवळच असलेल्या आरोग्य उपकेंद्रात गेली होती. त्याचा गैरफायदा घेत गतिमंद तरुणी एकटीच असल्याची आणि जवळ कोणी नसल्याची ती संधी साधून नानासाहेब भानुदास चौरे या नराधमाने तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केल्याची घटना घडली.

मुलाला डोस देऊन पीडित गतिमंद तरुणीच्या भावजाईने हा प्रकार पाहिला आणि तिने आरडाओरड केल्या नंतर गावातील नागरिकांच्या मदतीने आरोपीला ताब्यात घेतले.या खळबळजनक अत्याचाराची माहिती मिळताच केज पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे, सहाय्यक पोलिस निरीक्षक क्षिरसागर, पोलिस उपनिरीक्षक सय्यद कराडकर, पोलिस कॉन्स्टेबल शेख शमीम पाशा यांनी घटनास्थळी जाऊन आरोपीला ताब्यात घेतले. त्या नंतर पीडित तरुणीला वैद्यकीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात हजर केले आहे. या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात नानासाहेब चौरे याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र.नं .३५६/२०२५ भा न्या सं ६४(२)(के),६४(२)(आय),३५१(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा तपास पिंक पथकाचे पोलिस निरीक्षक प्रकाश शेळके हे करीत आहेत.

वाल्मीक कराडच्या समर्थासाठी केले होते आंदोलन :- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी आरोप असलेले वाल्मीक कराड याच्यावरील सर्व गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावेळ म्हणून नानासाहेब भानुदास चौरे याने राजेगावकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले होते.

आरोपी लिंगपिसाट :- नानासाहेब चौरे याच्यावर पूर्वी देखील लैंगिक अत्याचा, बालकांचे शोषण, ट्रॉसिटीसह, अवैध्य दारू विक्रीचे गुन्हे दाखल आहेत. एका लैंगिक गुन्ह्यात त्याला शिक्षा झालेली आहे. तर एक प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच तो देखील दिव्यांग तरुण सकाळी नाव्होली ते राजेगाव फाटा तेथील पाण्याच्या टाकीवर चढून बसला होता. नानासाहेब चौरे हा देखील पायाने दिव्यांग असून त्याला नीट चालता येत नाही.




**टी सी हरवला आहे**

नाव: सोनाली जनार्धन ढवळे
रा. शिक्षक कॉलनी बीड
रोड केज शिक्षण B.Sc पासचा
टीसी हरवला आहे
केज अंबाजोगाई प्रवास करताना
टीसी हरवला आहे
सापडल्यास खालील मोबाईल
नंबरवर संपर्क साधावा.
मो.९८९०९८६५२८

# आदर्श शिक्षक राजेंद्र सोनवणे यांचा सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात संपन्न




केज/प्रतिनिधी

आदर्श शिक्षक राजेंद्र सोनवणे सर यांचा केज तालुक्यातील तांबवा येथे सेवानिवृत्ती सोहळा अत्यंत उत्साहात व स्नेहभावनेत साजरा करण्यात आला. दीर्घकाळ सार्वजनिक सेवेत कार्यरत असलेल्या राजेंद्र सोनवणे सर यांनी आपल्या कार्यकाळात तब्बल ३६वर्षाचा प्रदीर्घ असा शैक्षणिक क्षेत्रातील अभिमानास्पद अन् गौरवास्पद प्रवास प्रामाणिकपणा, सचोटी व लोकाभिमुख दृष्टिकोन यामुळे सर्व सहकाऱ्यांमध्ये व समाजात विशेष स्थान निर्माण केले होते.

केज तालुक्यातील तांबवा येथील तांबेश्वर मंगल कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर त्याने विद्यार्थीनिनी नृत्य सादर करून सत्कारमूर्तींचे स्वागत केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. संतोष अर्जुनराव कांदे (अध्यक्ष, शा.व्य.समिती, तांबवा) होते, प्रमुख पाहूणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार यांच्या पक्षाचे नेते हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, नगरसेविका सौ. पद्मिनी आक्का शिंदे, लक्ष्मण बेडस्कर साहेब (गटशिक्षणाधिकारी), सौ. दिपालीताई अरुण चाटे (सरपंच, ग्रा.पं. तांबवा) मिराताई अनिल चाटे (उपसरपंच ग्रा.पं. तांबवा) तसेच मुख्याध्यापक नेहरकर सर, चाटे मच्छिंद्र सर, शिंदे मॅडम, गुजर मॅडम, औताडे मॅडम, खरबडे मॅडम बालासाहेब चाटे सर, चाटे सर, गळगटे सर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सचिव कचरू खळगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रकाश उजगरे दैनिक चंपावतीपत्र माजलगाव तालुका प्रतिनिधी महेंद्र मस्के यांच्यासह अनेक सहकारी, मित्र, कुटुंबीय व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सोनवणे सर यांची मुलगी डॉ. राखी सोनवणे आपल्या भाषणातून वडिलांचे कौतुक केले सातवीच्या विद्यार्थीनी पंकजा चाटे, भरती चाटे यांनी देखील भाषण केले उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून राजेंद्र सोनवणे सर यांच्या कार्यपद्धतीचे, शिस्तप्रियतेचे व सामाजिक

बांधिलकीचे मनापासून कौतुक केले. सोनवणे सर यांनी आपल्या उत्तरार्धातील भाषणात सर्व सहकाऱ्यांचे, वरिष्ठांचे व कुटुंबियांचे आभार मानले. त्यांनी सेवानिवृत्तीनंतरही सामाजिक कार्यात सक्रिय राहण्याची इच्छा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हजारे सर, प्रास्ताविक केंद्रे सर तर आभार प्रदर्शन अभिमान मस्के, चाटे दत्तात्रय यांनी केले. स्वमनोगत राजेंद्र सोनवणे सर यांनी केले.

## खंदारे गुरुजींची गुरुवचने





डॉ संगिता पिंगळे
बीड

पात्रच व्हा,अखंड चिंतनाने पात्रता येते असे गुरुजी म्हणाले.

पात्रच व्हा,अखंड चिंतनाने पात्रता येते असे गुरुजी म्हणाले. गुरुजी तुम्ही आम्हाला पात्र करण्यासाठी पात्र म्हणून निवडून पराकाष्ठा करत आलात. अखंड चिंतन म्हणजे एका विशिष्ट रुपाचे की गुणांचे की शक्तीचे की कृपेचे की प्रेमाचे हा प्रश्न साधकाला पडू शकतो. आपल्या आईचे चिंतन सहज करता येते अन तिच्या वात्सल्याने ऊर भरून येतो.तसेच ईश्वराचे म्हणा की ब्रह्माचे म्हणा चिंतन करण्यासाठी साधकाला आधी त्याची ओळख व्हावी म्हणून तोच ईश्वर सद्गुरु रुपात आला आहे या भूलोकी .आता त्याचे अखंड चिंतन केले की तेच त्यांचे मूळ रुपात दर्शन देतात, त्यामुळे पात्रता येते अन मग अखंड आपण त्याचे पात्र होतो .त्यामुळे अखंड चिंतन गुरुजींचे करुयात अन पात्र होवूयात .चला. थँक्स गुरुजी आपला नित्य जळगावकर असो.

# आंबेवडगाव येथे ग्राम दरबार संपन्न; नागरीकाचे तक्रारीचे केले समाधान

क्लि्ले धारूर/प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील आंबेवडगाव येथे दिनांक २/७/२५ वार बुधवार रोजी गावातील मध्यभागी आसलेल्या हनुमान मंदिरावर व मोकळ्या परिसरामध्ये भरगच्च असा ग्राम दरबार ग्रामपंचायत कार्यालय आंबेवडगाव व तसेच पंचायत समिती किल्ले धारूर यांच्या वतीने ग्राम दरबार भरवण्यात आला यावेळी नागरिकांचे प्रश्न ऐकून त्यांच्या प्रश्नाला उत्तरे देऊन तक्रारींच्या निरसन करण्यात आले या ग्राम दरबारासाठी धारूर पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी एस एल कांदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. विभागीय आयुक्त संभाजी नगर यांच्या आदेशाने दर पंधरवड्याला तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये . ग्राम दरबार घेण्याचे आदेश असल्यामुळे हा ग्राम दरबार घेण्यात येत आहे यामध्ये कृषी विभाग ग्रामपंचायतविभाग पशुसंवर्धन विभाग आरोग्य विभाग महिला व बालकल्याण विभाग शिक्षण विभाग स्वच्छता विभाग पाणीपुरवठा विभाग घरकुल विभाग प्रत्येक विभागाचे अधिकारी हजर राहून लोकांच्या समस्याचे निराकरण करतात व योजनेविषयी माहिती सांगितली जाते यावेळी ग्रामपंचायत पंचायत समिती विभाग धारूरची विस्तार अधिकारी राऊत यांनी वेगवेगळ्या योजनेची व लाभार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन विस्ताराधिकारी राऊत यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले यावेळी गट विकास अधिकारी कांदे साहेब यांनी वेगवेगळ्या योजनेविषयी माहिती सांगितली शेतकऱ्यांनी प्रगतशील शेतकरी कसे होता येईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे सध्या नवनवीन तंत्रज्ञानाचा शोध लावला जात आहे . शेतकऱ्यांच्या मदतीसाठी रोबोट धावून येणार आहे पिकामध्ये उसामध्ये कोण कोणते रोग पडले आहेत हे आता आपल्याला रोबोटच्या माध्यमातून सांगितले जाणार आहेत आणि रोबोटच शेतकऱ्यांची शेती करणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या तंत्रज्ञानाचा व योजनेचा लाभ घेणे आवश्यक आहे शेती सुजलाम सुफलाम केली पाहिजे शेतकऱ्यासाठी रोजगार हमी योजने मधून पाच लाखाची विहीर दिली जाते तसेच पाणी साठवण्यासाठी शेततळे ही वेगवेगळ्या प्रकारची दिले जातात यासाठी पंचायत स्तरावरून प्रयत्न केले जातात यामध्ये शेतकऱ्यांनी आपली प्रगती साधली पाहिजे पुढील मार्गदर्शन करताना पशुसंवर्धन विभागाचे डॉक्टर कंठाळे साहेब यांनी संवर्धनाविषयी या ग्राम दरबारामध्ये लोकांना माहिती दिली कुक्कुटपालन पालन शेळीपालन यासाठी शेतकऱ्यांनी आपापले अर्ज ऑनलाईन पोर्टलवरून भरून ते अपलोड करावेतयासाठी बँकेची सहकार्य असणे महत्त्वाचे आहे बँकेमार्फत कर्ज दिले जाते आणि या योजनेला हातभार लावला जातो




बँकेची संपर्क साधून शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे पशुसंवर्धन विभागामार्फत सांगण्यात आले शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांबरोबरच पालकांनीही प्रयत्न करावेत असे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक अर्जुन मुंडे यांनी सांगितले हाय सिटीमार्फत येणारे योजना आहाराविषयी मार्गदर्शन सिंधुताई घोळवे यांनी केले या कार्यक्रमाला या गावचे ग्रामविकास अधिकारी शिवाजी गीते सरपंच उतरेश्वर घोळवे प्रकाश सिरसट उनकेश्वर घोळवे सुनिल वाघमोडे ग्राम पंचायतसदस्य गावा तिल जेष्ठ नागरिक हजर होते सूत्रसंचालन रामधन घोळवे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिवाजी गीते यांनी मानले

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब यांनी निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय : दैनिक मराठवाडा दर्शन, माधव नगर, धारूर रोड, केज ता.केज जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PUBLISHED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB ON BEHALF OF HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PRINTED AT NIRMITEE PRINTS, KABAD GALLI, BEED TQ.DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT.THE OFFICE OF DAILY MARATHWADA DARSHAN, At.MADHAV NAGAR, DHARUR ROAD, KAIJ TQ.KAIJ, DIST.BEED ( MAHARSHTRA).
EDITOR- HANDIBAG DATTATRAY BALASAHEB